# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

**दिनांक ०९.०५.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**कळमना पोलीसांची कामगीरी :— गोवंशीय जनावराची चोरी तथा वाहन चोरीचा गुन्हा, असे एकुण ०२ गुन्हे उघडकीस.**

**अ)** फिर्यादी आनंद कन्हैय्यालाल खट्टर, वय ३८ वर्षे, रा. तुलसी नगर सोसायटी, प्लॉट नं. ३८, सिल्व्ही हॉस्पीटल जवळ, शांतीनगर, नागपुर यांचा पोलीस ठाणे कळमना हद्दीत सुपारीचा कारखाना असून, तेथेच तळमजल्यावर फिर्यादी यांनी गोवंशीय जनावरांकरीता गोठा तयार केला आहे. गोठ्यात एकुण ०६ गायी पाळल्या असुन, त्यांचे रखवालीकरीता रखवालदार नामे रोशन साहु नावाचा ईसम आहे. दिनांक ०७.०५.२०२६ चे १४.३० वा. ते १७.०० वा. चे दरम्यान, रखवालदार याने नमुद ०६ गायींना चरण्याकरीता चिखली देवस्थान जवळील मोकळ्या जागेत सोडून दिले असता, त्यापैकी सायंकाळी ०५ गायी परत आल्या व ०१ गाय परत आली नाही. तिचा परिसरात शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची गाय किंमती १५,०००/—रू. ची चोरून नेली. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून, पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. विजय गिराम ९२८४९८२९३५ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, पोलीस ठाणे कळमना येथील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, गुन्ह्यातील आरोपींना निष्पन्न केले. खात्रीशीर माहितीवरून पोलीस ठाणे कपिलनगर हद्दीत सापळा रचून, आरोपी सोहेल अली कादर अली उर्फ बिल्ला, वय २४ वर्षे, रा. अशोक सम्राट नगर, उप्पलवाडी, मुस्ताक शेख अब्दुल सत्तार यांचे घरी किरायाने, कपिलनगर नागपूर यास ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी क्र. १) अभिजीत उर्फ काली ठाकुर, रा. कपिलनगर २) फैजान नावाचा ईसम, रा. मोमीनपूरा, नागपुर यांचेसह संगणमताने वर नमुद गोवंशीय जनावर चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेली गाय व गुन्ह्यात वापरलेली ब्रिझा कार वाहन क्र. एम.पी. २८ झेड.के. ९५५५ तसेच, आय २० कार क्र. जी.जे. ३१ बी.ए. ९७३२ असा एकुण किंमती १४,१५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**ब)** दिनांक २५.०४.२०२६ चे २३.३० वा. ते २३.४५ वा. चे दरम्यान, फिर्यादी नरेश नत्थुजी अनबोले, वय ३८ वर्षे, रा. १२०, गुलमोहर नगर, कळमना, नागपूर यांनी त्यांचे आईचे नावावर नोंदणी असलेली ॲक्टीवा ६जी मोपेड क्र. एम.एच. ४९ बी.टी ५९५२ किंमती ५०,०००/—रू. ही घेवून पेट्रोल भरण्यासाठी गेले होते. पेट्रोल भरून झाल्यावर, फिर्यादी हे दारूचे नशेत असल्याने त्यांचेकडून वाहन सुरू होत नव्हते. दरम्यान, अंदाजे २२ वर्षे वयोगटातील दोन अनोळखी ईसमांनी फिर्यादी जवळ येवून म्हटले की,

‘‘आम्ही तुमची गाडी सुरू करून देतो, आम्हाला थोड्या अंतरावर पुढे सोडून दया’’ असे म्हणून तिघेही पोलीस ठाणे कळमना हद्दीत, एच.बी टाऊन कडून चिखलीकडे जाणाऱ्या रोडवर काही अंतरावर गेल्यावर, फिर्यादी हे गाडीवरून उतरून, पायदळ चालून पाय मोकळे करत असतांना, फिर्यादी सोबत आलेल्या दोन अनोळखी ईसमांनी फिर्यादीची ॲक्टीवा गाडी घेवून पसार झाले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे दोन अनोळखी ईसम आरोपींविरूध्द कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान, पोलीस ठाणे कळमना येथील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून व खात्रीशीर माहितीवरून गुन्ह्यातील आरोपींना निष्पन्न केले. आरोपी १) जुनैद अक्तर खान, वय १९ वर्षे, रा. मोठा ताजबाग, सिंधीबन, ठाकुर प्लॉट, सक्करदरा, नागपूर २) मोहम्मद साजिद वल्द मोहम्मद सलीम, वय १९ वर्षे, रा. मोठा ताजबाग, सज्जुभाई आलमारीवाले कारखान्याजवळ, ह.मु.—कामगार नगर, जयभिम गेट जवळ, कामठी, जि. नागपूर यांना ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्यांनी संगणमताने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन चोरी केलेले ॲक्टीवा ६जी मोपेड क्र. एम.एच. ४९ बी.टी ५९५२ किंमती ५०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील दोन्हीही कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजीराव राठोड अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. डॉ. संदीप पखाले, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (अति.कार्य. कळमना) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, पोनि. (गुन्हे) करीम खॉ पठाण, सपोनि. शशीकांत मुसळे, पोहवा. रविकुमार शाहु, प्रमोद कंगाले, विशाल भैसारे, पोअं. मंगेश लोही, नितीन मिश्रा, संतोष पांडे, ललीत शेंडे, अनिल जाधव, अजय गटलेवार, व अविनाश ग्वालवंशी यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे नंदनवन :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०३.०५.२०२६ चे ११.०० वा. ते दिनांक ०८.०५.२०२६ चे ०९.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत पडोळे नगर, मोठ्या विहीरीजवळ, जयभिम चौक, नागपुर येथे राहणारे फिर्यादी महादेव दामोदर बोदेले, वय ४३ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह भावाचे लग्नसमारंभाकरीता भोजापूर, तह. पवनी, जि. भंडारा येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ५,५०,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ६,३३,२००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यांप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. गोपीनाथ राखोडे ७७२२०७७९०९ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन :–** सौ. सोनल जितेंद्र लाडेगे, वय ४० वर्षे, रा. नंदनवन झोपडपट्टी, गल्ली नं. ३, आंबेडकर चौक, नागपूर ह्या दिनांक ०५.०५.२०२६ पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– गोल, बांधा– मध्यम, केस– काळे लांब, अंगात– मेहंदी रंगाचा सलवार सुट व लाल रंगाची ओढणी घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे नंदनवन :–** संजय केवलराम नेवारे, वय ३८ वर्षे, रा. हरपुर नगर, गुड्डु देशमुख यांचे घरी किरायाने, नंदनवन, नागपूर हे दिनांक २४.०४.२०२६ रोजी पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– गोल, बांधा– मध्यम, केस– काळे–पांढरे, अंगात– एनसिसि कंपनीची केसरी रंगाची वर्दी घातलेले आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात. ओळख– उजव्या डोळ्याखाली जुन्या जखमेचे निशान आहे.



सोनल



संजय

**(अकस्मात मृत्यु)**

**१) पोलीस ठाणे तहसील :–** दिनांक ०८.०५.२०२६ चे १५.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे तहसील हद्दीत, मेयो हॉस्पीटल अपघात विभाग जवळील झाडाजवळ एक अनोळखी पुरूष वय ४० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

यांप्रकरणी फिर्यादी प्रुफल रामदास निकोडे, वय ३९ वर्षे, रा. वानाडोंगरी, मारोती मंदीरजवळ, हिंगणा, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे तहसील येथे पोउपनि. रोहन राणे ७५८८००९४९४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे तहसील :–** दिनांक ०९.०५.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे तहसील हद्दीत, भनारकर देशी दारू भट्टीजवळ भारत माता चौक, तहसील येथे एक अनोळखी पुरूष ईसम वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, लोकांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

मृतकाचे वर्णन–अंगात निळ्या रंगाचे रेघाटी चेक्सचा हाफ शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे कळमना येथे संपर्क साधावा.

यांप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे तहसील येथे पोउपनि. महेंद्र वासनिक ९९२२३१०७१४ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**